# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन शु. ४, १९४१ ( शके )

| | |
|---|---|
| (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(३) ऊर्जा मंत्री<br>(४) बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री<br>(६) आदिवासी विकास मंत्री<br>(७) सहकार, पणन मंत्री<br>(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

प्रश्नांची एकूण संख्या - ४९

---

### आदिवासी विभागाच्या अनेक योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

(१) * ८०५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा),

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेश सागर (चारकोप), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागांतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागात सन २००४-२००५ ते २००९-२०१० या कालावधीत गैरव्यवहार करुन विविध सरकारी योजना व प्रकल्पांतील कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तत्कालीन राज्य शासनाने निवृत्त न्यायमुर्ती एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) सदरहू चौकशी समितीच्या अहवालानंतर यामध्ये दोषी असलेल्या सनदी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नसल्याने राज्य शासनाच्या कार्यपध्दतीवर मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, यासंदर्भात सदर गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने २ महिन्यात चौकशी करण्यात येणार असल्याचेही मा.उच्च न्यायालयाला आश्वासित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यास तसेच कारवाई करण्यास पोलीस खाते सहकार्य करीत नसल्याचे बेजबाबदार प्रतिज्ञापत्र आदिवासी विभागाच्या प्रधान सचिवांनी सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(६) तसेच असे गैरव्यवहार होऊ नयेत यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यासाठी आदिवासी आयुक्त श्री.पी.डी.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदरहू प्रकरणी तात्काळ गुन्हे दाखल करुन दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालात संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच खाजगी संस्था/पुरवठादार यांच्याविरुद्ध फौजदारी/ वसुलीची कार्यवाही करण्याची शिफारस केली आहे. तसेच, चौकशी अहवालामध्ये नमूद केलेल्या अनियमिततांची पुनरावृत्ती होऊ नये या करीता करावयाच्या सुधारणांची शिफारस केली आहे.
(४) व (५) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालात नमूद अधिकारी/ कर्मचाऱ्यांपैकी आतापर्यंत ९६ अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुद्ध पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने पोलीसांनी ८९ प्रकरणी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल केले असून, उर्वरीत प्रकरणी कार्यवाही सुरू आहे. तसेच, चौकशी अहवालात नमूद सर्व ११६ खाजगी संस्था/ पुरवठादारांविरुद्ध तक्रारी दाखल केल्या असून १०५ संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. १३ कर्मचारी/अधिकारी यांना निलंबित केले असून १५ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी दोषारोपपत्र बजाविले आहे. नियमानुसार उर्वरितांवर कारवाई सुरू आहे.

सदरचे प्रकरण २००४ ते २००९ या कालावधीचे असुन न्या. गायकवाड समितीने आपला चौकशी अहवाल जानेवारी २०१७ मध्ये सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी तसेच योजनांच्या अंमलबजावणीमधील उणिवा लक्षात घेवून आदिवासी विकास विभागाने २०१७ पासून योजनांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता तसेच गतीशिलता आणणेसाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. आदिवासी नागरीकांना व विद्यार्थ्यांना विविध योजना व शैक्षणिक उपक्रमात थेट निधी त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. गॅसशेगडी वाटप, शेळी गट, दुधाळ जनावरे वाटप, पाईप, विजपंप वाटप अशा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना बंद करून त्या संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. महिला व बाल विकास विभागाकडील प्रोटीन वाटप, किंवा तत्सम खाद्य वाटप योजनांसाठी या विभागाकडून निधी देण्याचे बंद केले असुन दररोज ताजे जेवण अंगणवाडीमार्फत देण्याची अमृत आहार योजना सुरू केली आहे. विभागाने कायापालट अभियान यशस्वीरित्या राबविला आहे. स्वच्छ वातावरणात तयार करण्यात आलेला ताजा पोषक आहार पुरविण्याच्या उद्देशाने “मध्यवर्ती स्वयंपाकगृह” स्थापित केले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या अनुषंगाने “अटल आरोग्य वाहिनी” आणि “डिजी हेल्थ प्रणाली” असे उपक्रम सुरू केले आहेत. विभागाने डिजी हेल्थ प्रणाली, इंटिग्रेटेड हेल्थ डॅशबोर्ड, अनुदानित पोर्टल, केंद्रीय सहाय्य योजना पोर्टल, कायापालट पोर्टल, आश्रम शाळा डीबीटी, स्वयम, पेसा फंड व्यवस्थापन, नामांकित, ई-ट्राईब, स्कॅन आणि डिजिटलयाझेशनचे डीएमएस असे विविध पोर्टल सुरू करून अद्ययावत तंत्रज्ञान व आयटी प्रणालीचा वापर करण्यास सुरूवात केली आहे. नियमित लेखा परीक्षण अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात येत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा समावेश करून विभागाने प्रतिज्ञापत्राव्दारे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिल्या आहेत. अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात तसेच कारवाई करण्यास पोलीस खाते सहकार्य करीत नसल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटलेले नसुन उलटपक्षी, गृहखात्याबरोबर समन्वयाने पाठपुरावा चालु असल्याचे व आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल करण्याचे काम झाले असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद करण्यात आले आहे. तसेच संबंधित न्यायालयीन प्रकरणात गृहखातेदेखील प्रतिवादी असुन त्यांच्यामार्फत प्रतिज्ञापत्र सादर करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

(६) श्री.पी.डी.करंदीकर, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांनी त्यांचा अंतरिम अहवाल दि.१२.०२.२०१८ मध्ये शासनास सादर केला असून, यामध्ये न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालावर करावयाच्या कार्यवाहीसंदर्भातील कार्यपध्दतीचा समावेश आहे.

(७) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालात नमूद अधिकारी/कर्मचारी व खाजगी संस्था/पुरवठादार यांच्याविरुद्ध वरील उप प्रश्न (४) व (५) मध्ये नमूद केल्यानुसार पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करुन फौजदारी कार्यवाही आणि शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच संबंधित संस्थांना वसुलीबाबत नोटीस बजाविण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या उच्चदाब प्रणाली योजनेंतर्गत कामे अपुर्ण असल्याबाबत

**(२) * ९९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या उच्चदाब प्रणाली योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या कृषीपंपासह घरगुती, औद्योगिक व वाणिज्य वीज पुरवठा करण्यासाठी ८६ कोटी रुपयांची कामे माहे सप्टेंबर, २०१८ पासून सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याची मुदत दिली असताना देखील केवळ २८.३३ टक्केच काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत उच्चदाब प्रणालीची कामे अपुर्णावस्थेत असल्यामुळे जिल्ह्यातील ४३०० लाभार्थी शेतकऱ्यांना कृषीपंपांची प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उच्चदाब प्रणालीचे काम संथ गतीने करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) राज्य शासनाद्वारे महावितरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत दि. ३१.०३.२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपाच्या अर्जदाराकरिता सुरु करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्याकरिता ३९६३ कृषीपंप ग्राहक पात्र असून, त्याकरिता रु.४१.५९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यात ३४८२ रोहित्रे व ७४१ किलोमीटर उच्चदाब वाहिनी समाविष्ट असून सदर कामे सप्टेंबर, २०१८ व ऑक्टोबर, २०१८ मध्ये देण्यात आली आहेत.

(२) व (३) परभणी जिल्हयात उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत अंशत: टर्नकी पध्दतीने २१ कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर कामे पुर्ण करण्याची मुदत दि.३१.१२.२०१९ पर्यंत होती. त्याअनुषंगाने दि.३१.१२.२०१९ पर्यंत ३९६३ कृषीपंपापैकी १४४२ कृषीपंपांना वीज जोडणी देण्याचे काम पूर्ण झाले असून त्याची टक्केवारी ३६.३८ इतकी आहे. जानेवारी-२०२० अखेरपर्यंत परभणी जिल्हयात १७०५ वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित २२७८ कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) सदर प्रकरणी महावितरणने चौकशी केली असून ज्या कंत्राटदारांची कामाची प्रगती असमाधानकारक आहे, अशा तीन कंत्राटदारांना कामकाजाच्या प्रगतीमध्ये सुधारणा करणेबाबत नोटिस बजावण्यात आली आहे. तसेच तीन कंत्राटदारांना कंत्राट रद्द करण्याबाबत नोटिस बजावण्यात आलेली आहे. याशिवाय रोहित्र पुरवठादारांनाही पुरवठा वाढविण्याच्या सूचना केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना बँकाकडून पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) * २०४१ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या पावसाने शेतीतील पिकांचे नुकसान झाल्याने सुमारे २ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना पिककर्ज देण्यास राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका टाळाटाळ करत असल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरीय बँकर्स कमिटीने जिल्ह्यातील २ लाख ८२ हजार ६०१ शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत, व्यापारी व सहकारी बँकांच्या रब्बी हंगामात पीककर्ज उपलब्ध करुन देण्याचे उद्दीष्ट दिले आहे, त्यापैकी केवळ ११ हजार ४३० शेतकऱ्यांनाच बँकांनी पीककर्ज दिले असून उर्वरित शेतकरी आजही पीक कर्जाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्ह्यातील अनेक बँकाकडून शेतकऱ्यांना एक रुपयांचेही कर्ज दिले नाही अशा बँकांची चौकशी करण्याबाबत तसेच उद्दीष्टाप्रमाणे शेतकऱ्यांना पिककर्ज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

सोलापूर जिल्ह्यात जानेवारी, २०२० अखेर २७,६४१ शेतकऱ्यांना रु.३९,८६८ लाख इतके रब्बी हंगाम पीक कर्जवाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) सोलापूर जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतीशी निगडीत पिक कर्जाची परतफेड मुदतीत होऊ शकली नाही. त्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना शेती कामांकरीता नव्याने पीक कर्ज घेण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.सबब पीक कर्ज वाटपाचे प्रमाण कमी असल्याने दिसून येत आहे. मार्च, २०२० अखेर पर्यंत रब्बी पीक कर्ज वाटपाचा कालावधी असल्याने सदर कालावधी मध्ये लक्षांक पूर्ण करण्याची दक्षता घेणेबाबत सोलापूर जिल्हास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत सर्व बँकांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविण्याबाबत

**(४) * १५८३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गड्डीगोदाम शाखा (जि.नागपूर) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येत असल्याच्या निषेधार्थ वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान तीव्र आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर जिल्हयातील चोखामेळा वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी समाज कल्याण आयुक्त यांचेकडे करुन धरणे आंदोलन केले असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार पुरविणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच दोन्ही वसतीगृहातील विद्यार्थ्यांना दैनंदिन सकस आहार मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१)होय, अंशत: खरे आहे.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी डिसेंबर २०१९ मध्ये आंदोलन केले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हयातील संत चोखामेळा वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केलेले नाही. तर गड्डीगोदाम नागपूर येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आहे.

(३) होय.

(४) संबंधित वसतिगृहाच्या गृहपालाची बदली करण्यात आली असून वसतिगृहातील भोजन पुरवठादार बदलण्यात आला आहे.
(५) वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नियमानुसार भोजन पुरवठा करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आश्रमशाळातील समस्या

**(५) * १२५४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास प्रकल्पाअतंर्गत राबविण्यात येण्याऱ्या बहुतांश आश्रम शाळांतील आदिवासी मुला-मुलींना गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच आदिवासी विकास प्रकल्पाच्या अनेक आश्रम शाळांमधील मुख्याध्यापकांची पदे रिक्त असून त्यापदावर सहशिक्षकांनाच प्रभारी मुख्याध्यापकांचा पदभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्याध्यापकांची पदे भरण्याचा अधिकार हा आदिवासी अप्पर आयुक्तांना असतानाही अद्यापही पद न भरल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,

(४) असल्यास, आश्रम शाळेतील आदिवासी मुला-मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच मुख्याध्यापकांची रिक्त असलेली पदे भरण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) शहापूर प्रकल्पामधील २३ आश्रमशाळांपैकी १६ आश्रमशाळांना पक्क्या इमारती आहेत, २ आश्रमशाळा जलसंपदा विभागाच्या शेड मध्ये आहेत. तसेच ५ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. सर्व आश्रमशाळांमध्ये पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, स्नानगृह, मुलींची स्वतंत्र वसतीगृह, रस्ते व संरक्षण भिंत अशा सुविधा आहेत. सर्व आश्रमशाळांना बेंचेस, बेड, डायनिंग टेबल, खुर्ची, कपाट इ. फर्निचर पुरवठा केलेला आहे. तसेच उर्वी पिरामल फाऊंडेशन मार्फत नियमीत आरोग्य तपासणी केली जाते.
(२), (३), (४) व (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत एकून २३ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून माध्यमिक मुख्याध्यापकांची एकूण २० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ ठिकाणी नियमित मुख्याध्यापक कार्यरत असून उर्वरित ७ ठिकाणी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून माध्यमिक शिक्षक व पदवीधर शिक्षक यांच्याकडे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

माध्यमिक शिक्षक संवर्गाची अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याची व पदोन्नतीने माध्यमिक मुख्याध्यापक पदे भरण्याची अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे. मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीची कार्यवाही तातडीने करण्याच्या सुचना अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये सुरक्षेच्या परिक्षणाशिवाय कारखाने सुरु असल्याबाबत

**(६) * २५६० श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये सुरक्षेच्या लेखा परिक्षणाशिवाय (Safety Audit) कारखाने सुरु असल्याने कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षा धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये ३४१ कारखाने असून डोंबिवली औद्योगिक परिसरामध्ये गेल्या तीन वर्षात १८ दुर्घटना घडून २१ जणांचा मृत्यू झाला असे असतानाही सदर कारखान्यांमध्ये स्फोट होवून आग लागणे तसेच कामगारांचे अपघात होणे यासारख्या घटना घडत असून, या कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे जल प्रदुषण होत असल्याचेही दिनांक ६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षीप्रमाणे नियमानुसार व योग्य प्रमाणे सुरक्षेचे लेखा परिक्षण (Safety Audit) करणे आवश्यक असतांना देखील उक्त कारखान्यांचे लेखा परिक्षण होत नसल्याचे. प्रोबेस कंपनी यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांनी केलेल्या शिफारशी अंमलात आणल्या जात नसल्याचे निदर्शनास येत असून, कारखान्यांचे मालक आणि अधिकारी यांच्याबाबत देखील तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी सुरक्षेचे लेखा परिक्षण (Safety Audit) न करणाऱ्यांवर तसेच संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) डोंबिवली येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरामध्ये ३५० कारखाने असून या औदयोगिक परिसरामध्ये मागील ३ वर्षात आगीच्या ६, स्फोटाच्या ३,वायुगळतीच्या १ व इतर ९ अशा एकूण १९ दुर्घटना घडून त्यामध्ये ८ जणांचा मृत्यु झालेला आहे.

डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील ११६ कारखान्यांचे सुरक्षा लेखा परिक्षण (Safety Audit)

बाह्यसुरक्षा लेखा परिक्षकांकडून करण्यात आले आहे. तसेच उर्वरित कारखान्यांना सुरक्षा लेखा परिक्षण (Safety Audit) करून घेणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून प्राप्त माहितीनुसार सदर कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे जल प्रदूषित होत असल्याचे दिनांक ०६.११.२०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आल्याचे आढळून येत नाही.

प्रोबेस कंपनी बाबतच्या चौकशी अहवालामधील शिफारशीच्या अनुषंगाने विभाग निहाय शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. कारखान्यांचे मालक आणि अधिकारी यांच्याबाबत कोणत्याही तक्रारी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) कारखान्यांच्या परिक्षणा दरम्यान, सुरक्षेचे परीक्षण (Safety Audit) न करणाऱ्या तसेच अपघात चौकशी व निरीक्षणांदरम्यान आढळलेल्या नियमभंगाबाबत ३८ कारखान्यांविरुद्ध मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात शासकीय मुग खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(७) * ४७६१ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सन २०१८ मध्ये शासकीय मुग खरेदीसाठी नियुक्त केलेल्या कै.ज्ञानोबा फड कृषी निविष्ठा सह. संस्था मर्यादित व शीतल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित यांनी शेतकऱ्यांची मुग खरेदीची रक्कम परस्पर उचलून सुमारे ३ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार जिल्हा मार्केटिंग अधिकारी, बीड यांच्या संगनमताने केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली होती. सदर समितीने दिनांक १६/०८/२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालात कै.ज्ञानोबा फड कृषि निविष्ठा सहकारी संस्था, मर्या. धर्मापूरी, परळी बीड या संस्थेने दिलेला युजरआयडी व पासवर्डचा गैरवापर करुन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची परस्पर शीतल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, मर्या. गिरवली,अंबाजोगाई बीड येथे बचत खाती उघडली होती व या बँक खात्यावर ऑनलाईन पोर्टलवरुन चुकाऱ्याची रक्कम वर्ग करण्यात आली.

चौकशी अहवालात कै.ज्ञानोबा फड कृषी निविष्ठा सहकारी संस्था या संस्थेच्या व्यवस्थापन जो शीतल ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेशी संबंधित होता, त्याने गैरव्यवहार केला असल्याचे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने सदर दोन्ही संस्थाच्या दोषी अधिकारी/पदाधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच सदर दोन्ही संस्थांचे तात्काळ लेखापरिक्षण करण्याच्या सुचनाही निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील अपंग शाळेत झालेला गैरव्यवहार

**(८) * ४३२७ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात बोगस अपंग शाळा मोठ्या प्रमाणात असून सदर शाळांचे संस्थाचालक व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या संगनमताने शासनाच्या निधीमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार तेथील नागरिकांनी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे संस्थापक यांनी अपंग कल्याण आयुक्त, पुणे यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व बीड जिल्ह्यात तालुकानिहाय किती बोगस अपंग शाळा आढळून आल्या तसेच चौकशीच्या अनुषंगाने सदर शाळेचे संस्थापक व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) नाही.

बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांच्या बाबतीत आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शाळांची सविस्तर तपासणी करुन तपासणी अहवालावर सर्व संबंधीतांची सुनावणी घेवून योग्य ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यात उच्चदाब वीज वितरण प्रणाली योजना सुरु करण्याबाबत

**(९) * २४०२ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने वीजपुरवठा व्हावा या उद्देशाने शासनाने उच्चदाब वितरण व्यवस्था योजनेतून दोन शेतकऱ्यांमध्ये एक डी.पी.देण्याचा निर्णय घेतला असून नियमित वीज जोडण्यांसाठी अर्ज तसेच त्यासंदर्भात अनामत रक्कम स्विकारणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतुन उस्मानाबाद जिल्ह्यासाठी मागील वर्षात नऊ हजार डी.पी. चा लक्षांक ठेवण्यात आला होता परंतु केवळ ७५० शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमित वीज जोडण्यांसाठी अर्ज स्विकारणे बंद असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहु योजना पूर्णत्वास येण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) राज्य शासनाद्वारे महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येणारी उच्चदाब वितरण प्रणाली योजना दिनांक ३१.०३.२०१८ पर्यत पैसे भरुन वीज जोडणीसाठी प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपाच्या अर्जदारांकरिता सुरु करण्यात आली आहे. तसेच दिनांक ३१.०३.२०१८ नंतर पैसे भरुन वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जदारांचे महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावरील नवीन वीज जोडणी (New Connection) या पोर्टलवर अर्ज व अनामत रक्कम स्विकारली जात आहे.

(२) उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील दि. ३०.०३.२०१८ पर्यंत पैसे भरुन वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या एकूण ६९३० शेतकऱ्यांपैकी जानेवारी, २०२० अखेर ९३५ शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच दिनांक ३१.३.२०१८ रोजी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ज्या शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचे अंतर उच्चदाब वीज वाहिनीपासून ६०० मीटरपेक्षा जास्त आहे अशा ग्राहकांना मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेत समाविष्ट करुन वीज जोडणी घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत असून योजनेचा लाभ देणे सुरु आहे. उच्चदाब वितरण प्रणाली योजनेची कामे सुरु असताना अतिवृष्टीमुळे व शेतामध्ये पिके असल्यामुळे कामांमध्ये अडथळा येत होता व त्यामुळे विलंब झाला आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील निर्वासित वसाहतीमधील इमारती आणि सभोवतालाच्या क्षेत्राचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१०) * ११९८ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील निर्वासित वसाहतीमधील इमारती आणि इमारती सभोवतालाच्या क्षेत्राचा मुंबई शहराप्रमाणे क्लस्टर धोरण अवलंबून पुनर्विकास करण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्याकरिता स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल सादर करुन चार वर्षांचा कालावधी उलटला तरी यासंदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणतेच धोरण निश्चित केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे चेंबूर निर्वासित वसाहतीमधील इमारती व इमारती सभोवतालच्या क्षेत्रात राहत असलेल्या नागरिकांना अनेक अडचणींना व समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त समितीच्या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, अहवालानुसार शासनाचे धोरण निश्चित करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१), (२), (३), (४) व (५) चेंबूर विस्थापित वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने धोरण निश्चित्तिकरीता, शासनास अहवाल सादर करण्याकरीता ऑगस्ट, २०१३ मध्ये एक समिती गठीत करण्यात आली होती. समितीने २०१५ मध्ये वसाहतीमधील इमारती या घोषित झोपडपट्टया नाहीत, चेंबुर वसाहत मुंबई बेटाबाहेर असल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (५), (७),(९),(१०) मधील तरतुदी लागु होणार नाहीत, वसाहतीमधील सहकारी संस्थांना स्वत:चा पुनर्विकास करावयाचा असल्यास तो शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार करावा लागेल, अशा प्रकारच्या सुचना केल्या होत्या. त्यामध्ये नविन धोरण निश्चितीच्या अनुषंगाने शिफारशी नव्हत्या.

सायन कोळीवाडा वसाहतीतील २५ पैकी इमारत क्रमांक १-१९ व चेंबूर वसाहतीतील ३४ इमारतींमधील विस्थापितांना (अवैध हस्तांतरण प्रकरणे वगळून) सदनिकांच्या वैयक्तिक सनदा दिल्या आहेत. या सनदा (FREE HOLD) स्वरुपाच्या आहेत. सायन कोळीवाडा विस्थापित वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांची मिळकत पत्रिकेवर संस्थेचे नाव दाखल झाल्यास, पुनर्विकासासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता भासणार नाही, असे जिल्हाधिकारी, मुंबई शहर व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी निदर्शनास आणून दिले आहे. तद्नंतर, शासनाने प्रकरणाची तपासणी करून सायन कोळीवाडा विस्थापित वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांची नावे मिळकत पत्रिकेवर दाखल करण्याचे निर्देश ऑगस्ट, २०१९ मध्ये विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांना दिले आहेत.

सायन कोळीवाडाच्या धर्तीवर चेंबूर विस्थापित वसाहतीबाबतचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना डिसेंबर, २०१९ मध्ये दिले आहेत. त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त होताच त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मौजे वाढोली (जि.चंद्रपूर) या गावाचे स्थलांतर करण्याबाबत

**(११) * २७८२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वढोली हे गाव इरई नदीच्या तिरावर वसल्याने सतत पुराने वेढले जात असून गावाचे पुनवर्सन व स्थलांतर करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे मात्र अद्याप स्थलांतर व पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाचे स्थलांतर व पुनवर्सन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे वाढोली गावातील सर्वे नं.७८ व ७९ मधील एकूण ३.८९ हे .आर. एवढा जमीनीचा ताबा जमीन धारकांकडून घेण्यात आला असून त्यावर १५५ भूखंड तयार करण्यात आले असून त्यापैकी १३९ भूखंडाचे वाटप नागरीकांना करण्यात आले आहे. सदर पुनर्वसित ठिकाणी नागरी सुविधा पुरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या शेतजमीनीतून रिलायन्स कंपनीची टाकलेली गॅस पाईपलाईन

**(१२) * २०५० श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या शेतजमीनीतून रिलायन्स कंपनीची गॅस पाईप लाईन टाकण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींना त्यांच्या जमीनीचा मोबदला देतांना गुंठ्यामागे फक्त ८० हजार इतकी रक्कम देऊन दलालांना त्यापेक्षा मोठी रक्कम देऊन आदिवासींची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आदिवासी शेतकरी बांधवांनी उपोषण व आंदोलने केली असून देखील रिलायन्सचे संबंधित अधिकारी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करुन आदिवासींना जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

पेण तालुक्यातील दहेज नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पात वापराच्या हक्काच्या संपादन झालेल्या जमिनींची Petroleum and Minerals Pipeline Act, १९६२ प्रमाणे प्रति गुंठा रु. ८०,०००/- दराप्रमाणे सक्षम प्राधिकारी यांच्याकडून नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) होय, हे अंशतः खरे आहे.

पेण व खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी वाढीव नुकसान भरपाई मिळण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पेण कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्यात काही आदिवासी शेतकरी सामिल होते.
(४) पेण व खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनासंदर्भात तत्कालीन राज्यमंत्री (बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती व तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण) तथा पालकमंत्री, रायगड जिल्हा यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्राप्त झालेल्या १४८ अर्जाचे प्रत्यक्ष जागेवर पंचनामे केले आहे. त्यात मौजे शेडाशी, बोरगाव, शेणे, तळेखार व इतर गावातील आदिवासींचे अर्ज सामिल आहे. सक्षम प्रधिकारी यांच्या स्तरावरून प्रकल्पबाधीत व्यक्तींना नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर, बोदवड व रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील सोलर कृषी वीज पंप योजनेबाबत

**(१३) * ३१७४ श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणची उच्चदाब वितरण प्रणाली (HDVS) नावाची योजना तत्कालिन शासनामार्फत मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील भूजल पातळी ५०० ते १००० फूट खोल गेल्याने सुर्यप्रकाशावर आधारलेली सोलर कृषि वीज पंप योजना अयशस्वी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे केळी, कापूस, हरभरा, गहू व इतर पिकांना वाचविण्यासाठी वैयक्तिक खर्चातून खाजगी ठेकेदारामार्फत सदरील योजनेतून वीज जोडणी घेण्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शेतकरी वीज चोरीकडे वळत असून वीज वितरण कंपनी व पर्यायाने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) राज्य शासनाद्वारे महावितरणमार्फत राबविण्यात येणारी उच्चदाब वितरण प्रणाली योजना दिनांक ३१.०३.२०१८ पर्यत पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपांच्या अर्जदाराकरिता सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. तथापि मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेच्या मानकानुसार अर्ज मंजूर करण्यापूर्वी शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध आहे याची खात्री करण्याची जबाबदारी अधिक्षक अभियंता, महावितरण यांच्यावर टाकण्यात आली आहे. भूजल सर्वेक्षण विभागाच्या यादीतील सुरक्षित क्षेत्राव्यतिरिक्त अतिशोषित, शोषित, अंशतः शोषित क्षेत्रामधील लाभार्थ्यांच्या सौर कृषी पंपासाठीच्या अर्जावर भूजल सर्वेक्षण विभागाच्या नाहरकत प्रमाणपत्राच्या आधारे निर्णय घेण्यात येतो. रावेर तालुका क्षेत्र अतिशोषित, बोधवड तालुका क्षेत्र अंशतः शोषित क्षेत्रात तर मुक्ताईनगर तालुका क्षेत्र सुरक्षित क्षेत्रात येते. या योजनेअंतर्गत उपरोक्त तीन तालुक्यातून १२३ इतके अर्ज प्राप्त झाले असून ७४ अर्ज पात्र ठरले आहेत व २४ अर्जदारांनी मागणी पत्राचा भरणा केला असून त्यापैकी २१ अर्जदारांनी पुरवठादाराची निवड केल्याने १० लाभार्थ्यांचे पंप आस्थापित करण्यात आले आहेत. याशिवाय उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत या तीन तालुक्यातील पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या एकूण १९३३ अर्जदारांपैकी ४१७ अर्जदारांना वीज जोडणी देण्यात आली असून उर्वरित अर्जदारांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही. वरील वीज जोडणीच्या तुलनेत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या दोन वर्षात फक्त ९ अर्जदारांना वैयक्तिक खर्चातून वीज जोडणी (DDF) देण्यात आली.

(४) हे खरे नाही

(५) महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावरील नवीन वीज जोडणी (New Connection) या पोर्टलवर कृषी पंपांकरिता नवीन वीज जोडणीचे अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर व भाईदर (जि.ठाणे) येथील कांदळवनांचा होत असलेला ऱ्हास

**(१४) * ८१७ अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर व भाईदर (जि.ठाणे) येथे खाजगी आणि सरकारी जागेत कायद्याने असलेली बंदी आणि उच्च न्यायालयाचे आदेश असून देखील कांदळवनांची मोठ्या प्रमाणात तोड करून त्या क्षेत्रात भराव टाकून बांधकामे केली जात असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवना पासून ५० मीटर अंतरावर देखील भराव टाकला जात असून बेकायदेशीर बांधकामे झाली आहेत व आरएमसी प्रकल्पातून निघणारे सिमेंट आदींचे रासायनिक सांडपाणी बेकायदेशीरपणे थेट कांदळवनात सोडले जात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सर्व संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करून कांदळवन व सीआरझेड मधील बेकायदा भराव काढून टाकण्याबाबत तसेच येथील बांधकामे हटविण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबधित दोषींवर कारवाई करण्याबाबत

तसेच कांदळवनांची होत असलेली तोड व बेकायदेशीर बांधकामांना आळा घालण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, अपर भाईंदर तालुका समितीकडे एकूण प्रलंबित ८ जुन्या तक्रारींमध्ये दिनांक ३.१.२०२० रोजी स्थळपाहणी करण्यात आली. त्यापैकी एका तक्रारीमध्ये प्राथमिक चौकशी अंती पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ नुसार संबंधितांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. तर अन्य तीन तक्रारीत कांदळवनाची हानी करुन केलेले बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७.९.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय दिनांक १६.१०.२०१८ अन्वये राज्यातील सागरतटीय जिल्ह्यांकरिता कांदळवन संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोंकण यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. कांदळवन ऱ्हासाच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर समितीमार्फत कार्यवाही केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरपुर (जि.धुळे) तालुक्यातील रुमित केमिसिंथ प्रा.लि. कारखान्यात झालेला स्फोट

**(१५) * ३३९६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपुर (जि.धुळे) तालुक्यातील शिरपुर-शहादा रस्त्यावरील रुमित केमिसिंथ प्रा.लि. या रसायन निर्मिती करणाऱ्या कारखान्यात नायट्रोजन गॅसच्या सिलेंडरचा स्फोट होऊन १४ लोकांचा मृत्यु तसेच ६४ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नायट्रोजन गॅसचे सिलेंडर आणि रसायनाचे बॅरल एकाच जागी ठेवल्याने स्फोटाची तिव्रता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) रूमित केमिसिंथ प्रा.लि., शिरपुर (जि.धुळे) या कारखान्यात दिनांक ३१/०८/२०१९ रोजी घडलेली घटना नायट्रोजन गॅसच्या सिलेंडरचा स्फोट होवून घडलेली नसून, कारखान्यातील नायट्रेशन रिॲक्टरचा स्फोट झाल्याने घडलेली आहे.

सदर स्फोटाच्या व आगीच्या घटनेमध्ये कारखान्यातील ८ कामगार व कारखान्याबाहेरील ६ व्यक्ती अश्या एकूण १४ व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. तसेच कारखान्यातील ३५ कामगार व कारखान्याबाहेरील ३२ व्यक्ती असे एकूण ६७ व्यक्ती जखमी झाले आहेत.

तसेच स्फोट होऊन आग लागल्याने उष्णतेमुळे कारखान्यात इतरत्र ठेवलेले काही नायट्रोजन गॅसच्या सिलेंडरचे स्फोट झाले आहेत.

(३) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान असे आढळून आले की, कारखान्यात दिनांक ३१/०८/२०१९ रोजी सकाळी सुमारे ०९.४२वाजताचे सुमारास कारखान्यातील नायट्रेशन शेडमधील १.५ केएलएसएसरिॲक्टर मध्ये नायट्रो ब्युटीरामाइडचे उत्पादन सुरू होते.

सदर नायट्रेशन प्रक्रिये दरम्यान या १.५ केएलएसएस रिॲक्टरमधील रसायन द्रव्याचे तापमान वाढून त्याचे विघटन झाले व सदर रिॲक्टरचा अचानक स्फोट होवून त्याचे छोटेछोटे तुकडे कारखान्यात सर्वदिशेने फेकले गेले. हे लोखंडी तुकडे कारखान्यातील इतर संयंत्रावर आणि ज्वलनशील पदार्थाच्या  ड्रम्सवर पडल्याने कारखान्यात आग लागली.

दिनांक ३१/०८/२०१९ रोजी घडलेल्या घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आली असून चौकशीत महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ चे नियमांच्या तरतूदींचे भंग झाल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे संचानालयामार्फत कारखाना बंद करणे बाबत दि.०२.०९.२०१९ रोजी आदेश पारित केले आहेत.

याबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे यांच्या न्यायालयात कारखाना भोगवटादाराविरुध्द ६ खटले व कारखाना व्यवस्थापकाविरूध्द १ असे एकुण ७ खटले दाखल करण्यात आले आहेत .

कारखाना व्यवस्थापनाकडून मयत कामगार / व्यक्तींच्या अवलंबितास प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तर कायमचे अपंगत्व आलेल्या दोन कामगारांस प्रत्येकी रु.२.५० लक्ष इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे कार्यालयाकडून मयत कामगार / व्यक्तींच्या अवलंबितास प्रत्येकी रुपये २ लक्ष आणि गंभीर जखमी झालेल्या २० कामगार/व्यक्तींना प्रत्येकी रु.५० हजार इतक्या रक्कमेची आर्थिक मदत तहसिलदार शिरपुर यांचेमार्फत देण्यात आलेली आहे.

मे.रुमित केमिसिंथ प्रा.लि., शिरपूर, जि.धुळे या कारखान्यात दि.३१.०८.२०१९ रोजी झालेल्या अपघाताबाबत सखोल चौकशी व अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये याकरिता दि. १३.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी व तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने नुकताच चौकशी अहवाल सादर केला असून त्यावर शासन स्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील वसंत सहकारी साखर कारखाना बंद असल्याबाबत

**(१६) * २६७१ श्री.नामदेव ससाने (उमरखेड), श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील बंद असलेल्या वसंत सहकारी साखर कारखान्यावर असलेले कर्ज माफ करुन कामगारांनी कारखाना सुरु करण्याकरिता आणि थकीत वेतन तातडीने मिळण्याबाबत दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कारखान्याच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कारखाना बंद असल्याने प्राधिकृत अधिकारी नमुना स्वाक्षरी व डिजिटल स्वाक्षरी करीत नसल्यामुळे कामगारांना भविष्य निर्वाह निधी खात्यातील रक्कम मिळणेही अवघड झाले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

भविष्य निर्वाह निधी कार्यालय, अकोला यांनी दि.०७.१२.२०१८ रोजी वसंत सहकारी साखर कारखान्याचे दप्तर असलेली इमारत सिल केलेली आहे. कारखान्याच्या संचालक मंडळाने राजीनामे दिल्यामुळे प्रादेशिक सह संचालक (साखर) अमरावती यांनी दि.२७.०९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ (साखर) यवतमाळ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

परंतु, प्राधिकृत अधिकारी यांना कारखान्याचे रेकॉर्ड उपलब्ध झालेले नसल्यामुळे नमुना डिजिटल स्वाक्षरीबाबत कार्यवाही झालेली नाही.

(३) प्रादेशिक सह संचालक (साखर) अमरावती यांनी दि. २२.०१.२०२० रोजी यासंदर्भात अंमलबजावणी अधिकारी, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, अकोला आणि प्राधिकृत अधिकारी यांचे समवेत संयुक्त चर्चा केली आहे. तद्नंतर प्राधिकृत अधिकारी यांनी दि.२८.०१.२०२० रोजी भविष्य निर्वाह निधी कार्यालय, अकोला येथे वसुली अधिकाऱ्यासमोर साखर कारखान्याचे दप्तर व सिल केलेली साखर कारखान्याची इमारत ताब्यात मिळणेबाबत चर्चा केलेली असून साखर कारखान्याचे रेकॉर्ड उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पुणे व मुंबईत विविध दुर्घटनांमध्ये बांधकाम मजूरांचा झालेला मृत्यू

**(१७) * २२९३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व मुंबई जिल्हयातील विविध दुर्घटनांमध्ये बांधकाम मजूरांचा मृत्यू झाला असतानाही राज्य कामगार कल्याण मंडळाकडून सुमारे सात लाख बांधकाम मजूरांना सुरक्षासंच मिळाले नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बांधकाम मजूरांच्या अपघाती मृत्यूच्या घटना घडू नयेत तसेच त्यांना सुरक्षा संच पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेमार्फत राबविण्यात येत आहे. त्याद्वारे पुणे व मुंबई जिल्हयात अनुक्रमे २६२४० व ३१११७ बांधकाम कामगारांना सुरक्षा संचाचे वाटप केले आहे. तसेच राज्यातील ८५०००० बांधकाम कामगारांना सुरक्षा संचाचे वाटप करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) सद्यस्थितीत मुंबई व पुणे जिल्हयात तसेच राज्याच्या इतर जिल्हयात सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संचाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अ श्रेणीतील विनाअनुदानित तत्वावरील अपंगाच्या विशेष शाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदनिर्मितीबाबत

**(१८) * २५४६ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अ श्रेणीतील १२३ विनाअनुदानित तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांना शासनाने दिनांक ८ एप्रिल, २०१५ व दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ नुसार सदर शाळेतील कर्मचाऱ्यांना सतत ३ वर्ष पदनिर्मितीची मान्यता, १००% अनुदान व गेल्या १६ वर्षापासून मतीमंद विद्यार्थ्यांच्या अविरत सेवेतील कर्मचाऱ्यांचे वेतन लाभ अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याने लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मतिमंदाच्या अ श्रेणीतील १२३ विनाअनुदानित तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांच्या कर्मचाऱ्यांचे पदनिर्मितीचे प्रस्ताव गत काही महिन्यापासून मा.आयुक्त, अपंग आयुक्तालय पुणे यांचे कार्यालयात प्रलंबित असल्याने शासनाप्रती कर्मचाऱ्यामध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली असून बहुतांशी संस्थेतील कर्मचाऱ्यांना पदनिर्मितीस मान्यता, प्रशासकीय मान्यता व वेतनाचा लाभ मिळाला नसल्याने कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन प्रलंबित कर्मचाऱ्यांना वेतनाचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) १२३ शाळांमधील पदांना शासन निर्णय दि.६.११.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि काही संस्थांनी तद्नंतर त्यांना अनुज्ञेय ठरणाऱ्या पदसंख्येबाबत निवेदने सादर केलेली असल्याने सदर निवेदनांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील सोयी-सुविधांबाबत

**(१९) * २७५३ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना अतिशय निकृष्ट दर्जाचे भोजन पुरविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या पोषण आहारात दररोज विविध प्रकारचा आहार पुरविणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांना आठवडयातून एक दिवस बिस्कीट, केळी अथवा अंडी देणे बंधनकारक असतांनाही ते पुरविण्यात येत नाहीत तसेच वसतीगृहात पिण्याच्या पाण्याची समस्या असून प्रसाधन गृहाचीही दूरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी त्यांच्या विविध समस्यांबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे भोजन तसेच योग्य त्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) व (२) नाही.

(३) निवेदन आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारथी या संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(२०) * १६९९ श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुणबी-मराठा समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व शिष्यवृत्ती देण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवसंस्था (सारथी) ही बार्टी या संस्थेच्या धर्तीवर स्थापन करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेत निदर्शनास आलेली अनियमितता व गैरव्यवहाराबाबत शासनाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहु संस्थेत झालेला गैरव्यवहार पुन्हा होऊ नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) अंशत: खरे आहे. सारथी या संस्थेची स्थापना कंपनी कायदा, २०१३ अन्वये करण्यात आली असून बार्टी या संस्थेची स्थापना सहकारी संस्था नियमान्वये करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) सचिव, आपत्ती व्यवस्थापन आणि मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५/०१/२०२० रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीमार्फत सारथी संस्थेच्या कामकाजाची चौकशी करुन प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे.

सदर चौकशी अहवालाप्रमाणे संस्थेमध्ये वित्तीय व प्रशासकीय अनियमितता आढळून आल्या आहेत. सदर चौकशी अहवालाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रीय अधिकारी दर्जाच्या पाच अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(२१) * १५०४ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रीय अधिकारी दर्जाच्या पाच अधिकाऱ्यांनी संगनमताने भूखंडाची बनावट कागदपत्रे तयार केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कागदपत्रांवर खोट्या व बनावट नोंदी करुन कोट्यवधींच्या भूखंडाचे बेकायदेशीर वाटप करुन गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) होय.

उपरोक्त प्रकरणी महामंडळाकडून त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करून चौकशी करण्यात आली आहे.

अकोला विकास केंद्र औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र टीए-७८ हा भूखंड विनाभरणा करताच वाटप केल्याचे आणि टीए-४६, एन-१५४ व एन-१६० या भूखंडाच्या मुदतवाढ प्रकरणांमध्ये तत्कालीन प्रादेशिक अधिकारी व कर्मचारी यांनी अनियमीतता केल्याचे चौकशी समितीस आढळून आले आहे. दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी दोन सहायक क्षेत्र व्यवस्थापक व एक सहायक यांना महामंडळाच्या सेवेतून निलंबित केले आहे. प्रादेशिक अधिकारी (सेवानिवृत्त) व क्षेत्र व्यवस्थापक (सेवानिवृत्त) यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणा मधील अनियमिततेशी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन, एम.आय.डी.सी. अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस विभागामार्फत पुढील तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## 'क्यार' वादळात कोकणासह सिंधुदुर्ग जिल्हयातील किनारपट्टी भागातील शेतकरी, मच्छिमार व नागरीकांचे झालेले नुकसान

**(२२) * ६९४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात विशेषत: सिंधुदूर्ग जिल्हयात माहे जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये पडलेला संततधार पाऊस, क्यार वादळ तसेच माहे ऑक्टोबर, २०१९ अखेर पर्यंतच्या मुसळधार पावसामुळे काजू, भात शेती तसेच किनारपट्टी भागातील मच्छिमार व शेतकऱ्यांचे सुमारे १५०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु नुकसानीचे पंचनामे करुन शेतकरी, बागायतदार, मच्छिमार व नागरिकांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ७०० शेतकऱ्यांनी बँकेच्या बचत पुस्तिकेची छायांकित प्रत दिली नसल्याने त्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) व (२) होय.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यामधील कृषि विभागाकडून नुकसानीच्या पंचनाम्यांची यादी, हमीपत्रे व बँक पासबुक नंबर प्राप्त करुन घेण्यात आली असून त्यानुसार तहसिलदार, वेंगुर्ला यांच्यामार्फत निधी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णय दिनांक १८.११.२०१९, दिनांक १३.१२.२०१९ अन्वये व शासन निर्णय दिनांक ०१.०२.२०२० अन्वये एकूण रु. २४९९.०८ लक्ष निधी वितरित करण्यात आला असून रु. २०७९.२६ लक्ष अनुदान वाटप करण्यात आले आहे.

माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१९ मधील अतिवृष्टी व पुरबाधितांना द्यावयाच्या मदतीसाठी व माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये क्यार व महा चक्रीवादळामुळे झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या मच्छिमारांच्या नुकसानीच्या अनुषंगाने द्यावयाच्या मदतीसाठी, निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना शासनपत्र दिनांक १५.११.२०१९, दिनांक ०४.०१.२०२० व दिनांक ०५.०२.२०२० अन्वये क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने सदर निधी मागणीचे प्रस्ताव प्राप्त होताच निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

माहे जुलै ते ऑगस्ट, २०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पूर यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या मत्स्य व्यवसायाच्या नुकसानीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्यात मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(२३) * ५८० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत शासनाच्या स्थापन केलेल्या तज्ञ समितीने, केंद्र शासनाला दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात येऊनही अद्याप मान्यता दिली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव केंद्र शासनाने राज्याच्या साहित्य अकादमीकडे पाठविला असून, त्याबाबत राज्य शासनास कोणतीही माहिती नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याकरिता मा.पंतप्रधान महोदयांना दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी लेखी निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा याबाबतचा विहित प्रस्ताव शासनाने दि.१६.११.२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाने केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेकडे भाषा तज्ज्ञांच्या समितीसमोर हा प्रस्ताव सादर केला आहे. ही बाब केंद्र शासनाने दि.१६.०५.२०१९ च्या पत्रान्वये राज्य शासनास कळविली आहे.
(३) होय.
(४) मराठी भाषा ही केंद्र शासनाने अभिजात भाषेसंबंधित विहित केलेले सर्व निकष पूर्ण करीत असल्याने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा याबाबत शासनाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीने खारफुटी आणि कांदळवनाची बेकायदेशीर केलेली तोड

**(२४) * ८९० श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीने खारफुटी आणि कांदळवनाची बेसुमार व बेकायदेशीर तोड करुन सी.आर.झेड चे उल्लंघन करुन कन्वेअर बेल्टचे काम सुरु केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सी.आर.झेड. चे उल्लंघन करुन जे.एस.डब्ल्यू कंपनीने तत्कालिन महसूल आणि वन खात्याच्या संगनमताने खारफुटी आणि कांदळवनाची तोड करुन त्याठिकाणी कन्वेअर बेल्टचे काम करण्याकरिता मोठ मोठे काँक्रिटचे फांउंडेशन टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंपनीने कांदळवन मोठया प्रमाणात नष्ट करणे, संरक्षित प्रजाती नष्ट करणे परिणामी याठिकाणी पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास व नियमाचे उल्लंघन करुन सी.आर.झेड. बाधित जमिनीतून कन्वेअर बेल्टचे काम केलेले असतांनाही शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करुन सुरु असलेल्या कामास तात्काळ स्थगिती देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) मौजे जुई बापुजी, ता.अलिबाग येथील स.नं.५० ड मधील कांदळवन क्षेत्र दिनांक १२.१२.२०१८ रोजी महसूल विभागाकडून वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले. त्यापुर्वीच सदर क्षेत्रावर कन्वेअर बेल्ट व इतर कामे करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) सदर क्षेत्रावर जे.एस.डब्ल्यु. कंपनीने कन्वेअर बेल्ट व इतर वनेत्तर कामे केल्याचे निदर्शनास आल्यांनतर दिनांक ३.२.२०२० रोजी वस्तुस्थितीनिहाय पंचनामा करुन सदर कंपनी विरुद्ध दिनांक ३.२.२०२० रोजी वनगुन्हा नोंदवून नियमानुसार कारवाई केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांनी आदिवासी विकास महामंडळाला केलेल्या धानविक्रीची रक्कम देण्याबाबत

**(२५) * १४१ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील आदिवासी विकास महामंडळाला धानविक्री केलेल्या एक हजार शेतकऱ्यांचे ६ कोटी रुपये देणे शिल्लक असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश शेतकरी सालेकसा, आमगांव, मोरगांव अर्जुनी, नवेगांव बांध या परिसरातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यासा, शेतकऱ्यांनी ज्यांच्याकडून कर्जे घेतली आहेत त्या व्यक्ती तसेच सावकार यांचेकडून शेतकऱ्यांकडे कर्जाच्या पैशांबाबत वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विकास महामंडळाकडील शेतकऱ्यांचा ६ कोटी रुपयांचा शिल्लक निधी देण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२), (३) व (४) होय.

गोंदिया आणि भंडार जिल्हयातील सालेकेसा, मोरगांव, अर्जुनी व नवेगांवबांध परिसरातील १००० शेतकऱ्यांचे रु.६ कोटी रक्कम NeML पोर्टलवरील तांत्रिक अडचणीमुळे तसेच सर्वर डाऊनमुळे विहित वेळेत अदा झालेले नाही. दि.०६.०१.२०२० रोजी ॲक्सिस बँकेचा सर्व्हर सुरु झाल्यानंतर शेतकऱ्यांची देयके अदा करण्यांत आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-अर्नाळा (जि.पालघर) किनाऱ्यावर वायु वादळाने झालेले नुकसान

**(२६) * ३२१७ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-अर्नाळा (जि.पालघर) येथील समुद्र किनाऱ्याजवळ अरबी समुद्रात नुकत्याच झालेल्या वायु वादळाच्या ताशी १७० किलोमिटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे अर्नाळा किल्ल्यातील अनेक घरांच्या भिंती कोसळल्या तसेच तेथील काही घरांची छप्पर ही उडून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्नाळा किल्ल्याच्या परिसरात धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याची वेळोवेळी मागणी करुनही अद्यापही बांधला गेला नसल्याने अर्नाळा

किल्ल्यातील घरांवर लाटा आदळल्याने तेथील घरांच्या भिंती कोसळल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वायु वादळांमुळे झालेल्या नुकसानीची चौकशी करण्यात येऊन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अर्नाळा किल्ला परिसरात धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासंबंधी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) वायु वादळामुळे कोणतेही नुकसान झाले नाही.

(४) पालघर जिल्ह्यातील वसई-अर्नाळा समुद्र किनाऱ्याजवळील अर्नाळा किल्ला येथील (०/०० ते ०/९०) असे ९० मीटर लांबीचे धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पतन अभियांत्रिकी विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

पुढील लांबीत (०/९० ते ०/३३०) असे २४० मीटर लांबीच्या समुद्र धुपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

तसेच सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पात (०/३३० ते ०/५५०) असे २२० मीटर लांबीच्या बंधाऱ्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात उच्च दाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या कृषी पंप वीज जोडणीबाबत

**(२७) * १४७८ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात उच्च दाब वितरण प्रणाली (HDVS) या योजनेअंतर्गत ८५०७ कृषीपंप वीज जोडणीस पात्र असणाऱ्यांपैकी १७४७ कृषीपंपांना वीज

जोडणी मिळालेली असुन अद्याप ६७६० शेतकऱ्यांनी पैसे भरुनही वीज जोडणी न मिळाल्याने त्यांचे अतोनात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१८ नंतर हजारो शेतकरी शेतीपंपाच्या वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असून, सद्य:स्थितीत शेतकऱ्यांचे अर्ज व अनामत रक्कम स्विकारली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कृषीपंप वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यात दिनांक ३१.०३.२०१८ अखेर ८५९६ पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना वीज जोडण्या देण्याकरिता अंशत: टर्नकी पध्दतीने २६ कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले आहेत. या कंत्राटदारांमार्फत जानेवारी, २०२० अखेरपर्यंत एकूण १४५३ कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच एका कंत्राटदारास ४१५२ कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा करण्याबाबत पूर्णत: टर्नकी निविदेचा कार्यादेश दिला असून त्यापैकी जानेवारी, २०२० अखेरपर्यंत ६५३ कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. अशाप्रकारे सांगली जिल्ह्याअंतर्गत अंशत: टर्नकी व पूर्णत: टर्नकी पध्दतीमध्ये जानेवारी, २०२० अखेरपर्यंत एकूण २१०६ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही. दिनांक ३१.०३.२०१८ नंतर सांगली जिल्ह्यात पैसे भरुन वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या ग्राहकांची संख्या १८७६ असून महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावरील नवीन वीज जोडणी (New Connection) पोर्टलवर नवीन वीज जोडणीचे अर्ज स्वीकारले जात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील भूकंपग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२८) * ८४३ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, पालघर ,तलासरी (जि.पालघर) या भागात वारंवार भूकंपाचे धक्के बसत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूकंपाच्या २.९ रिश्टर स्केलच्या धक्क्यामुळे गावातील अनेक घरे कोसळली असून रस्त्यांना तडे गेल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार बसणाऱ्या भुकपांच्या धक्क्यांनी ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले असुन त्याचा परिणाम रोजगारावर व आजुबाजूच्या परिसरातील गांवावर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन भुकंपामध्ये नुकसान झालेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१), (२), (३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) भूकंपाच्या धक्क्यांमुळे प्रभावित क्षेत्रातील नागरिक घराबाहेर निवारा करुन राहत आहेत. त्यांच्यासाठी तात्पुरती निवारा शेड उभारण्यात आले आहेत. त्यासाठी ताडपत्री व तंबू पुरविण्यात आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या मागणी/विनंतीनुसार शासनाकडून वेळोवेळी पालघर जिल्हयास यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.

----------------

## साक्री (जि.धुळे) रोडवरील कुमार नगरमध्ये वीजेच्या खांबातील विद्युत प्रवाहाने बालकाचा झालेला मृत्यु

**(२९) * ११६६ श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) रोडवरील कुमार नगरमध्ये वीजेच्या खांबात विद्युत प्रवाह उतरल्यामुळे तेथे खेळत असलेल्या चार वर्षाच्या मुलाचा शॉक लागून मृत्यु झाला असून एक वृध्द महिला जखमी झाल्याची घटना दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वीजेच्या खांबात वीजप्रवाह उतरत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी संबधित वीज कंपनी व महानगरपालिकेकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुंषगाने संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मृत्युमुखी पडलेल्या व जखमी झालेल्या व्यक्तीच्या कुटूबियांना शासनाने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे अंशत: खरे आहे.

गौरीनगर, दूध डेअरी जवळ, कुमारनगर, धुळे येथे दिनांक १०.१२.२०१९ रोजी रात्री ९.०५ च्या दरम्यान महावितरण कंपनीचा लोखंडी पोल विद्युत भारित झालेला असल्याने ४ वर्षाच्या मुलाचा विद्युत प्राणांतिक अपघातामध्ये मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. परंतु दिनांक ११.१२.२०१९ रोजी एक वृध्द महिला जखमी झाल्याची सूचना महावितरण, विद्युत निरीक्षक व महानगरपालिका यांना प्राप्त झालेली नाही.

(२) कुमार नगर, धुळे, जिल्हा धुळे येथील महावितरण कंपनीच्या पोलमध्ये वीज प्रवाह उतरत असल्याची तक्रार महावितरण कार्यालयास दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी प्राप्त झाली होती. महावितरणद्वारा घटनास्थळास भेट देऊन आवश्यक कार्यवाही करुन तक्रारीचे निरसन करण्यात आले होते.

(३) सदर प्रकरणाची चौकशी विद्युत निरीक्षक, धुळे यांचेमार्फत करण्यात आलेली असून सदर अपघातास महावितरण कंपनी व धुळे महानगरपालिका यांना झालेल्या नुकसानीस संयुक्तिकरित्या जबाबदार धरण्यात आलेले आहे. धुळे महानगरपालिकेने अहवालास हरकत घेतली आहे. तसेच महावितरण कंपनीच्या संबंधित दोषी कर्मचाऱ्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी महावितरण कपंनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत मंजूरी देण्यात आली असून ती अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धानोरा (जि.गडचिरोली) येथे आदिवासी विकास महामंडळाच्या आधारभुत धान खरेदी केंद्रावरील शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याबाबत

**(३०) * २१२४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (जि.गडचिरोली) येथे आदिवासी विकास महामंडळाकडून आधारभुत धान खरेदी केंद्र दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आधारभुत धान खरेदी केंद्रावर आतापर्यंत १०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी केलेल्या २५०० क्विंटल धान विक्री पोटी ४५ लक्ष ३७ हजार ५०० रुपयाचे चुकारे (देयके) थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, आधारभुत धान खरेदी केंद्रावरील शेतकऱ्यांचे थकीत चुकारे अदा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय.

(२) धानोरा खरेदी केंद्रावर १४७ शेतकऱ्यांकडून ४४१८.९६ क्विंटल रक्कम रु.८०,२०,४१२.४० चा धान खरेदी करण्यात आला असून, त्यापैकी १३१ शेतकऱ्यांना दि.०४.०२.२०२० अखेर ४१६३.०३ क्विंटल धानाची रु.७५,५५,८९९.४५ इतकी रक्कम अदा करण्यांत आली आहे. माहे जानेवारी, २०२० मध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाने नियुक्त केलेल्या NeML पोर्टल सुरळीत नसल्याने धानारो तहसिल कार्यालयात खरेदी केलेल्या धानाच्या नोंदी घेण्यास अडचणी आल्याने शेतकऱ्यांच्या धानाचे देयके अदा करण्यास विलंब झाला. उर्वरित १६ शेतकऱ्यांच्या धानाची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मुलुंड (पूर्व) येथे फ्लेमिंगो निरिक्षणासाठी पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत

**(३१) * ३४६१ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडी किनाऱ्यावर फ्लेमिंगो निरीक्षणासाठी मुलुंड (पूर्व) येथील खाडीतून पर्यटकांना जाण्यासाठी मच्छिमारांच्या बोटींना परवानगी व प्रशिक्षक देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलुंड पूर्व येथे नानेपाडा, गव्हाणपाडा, नवघर व नाहूर गाव ही भूमी पुत्रांची गावे असून फ्लेमिंगो अभयारण्याच्या संवेदनशील क्षेत्रातील कोळी बांधवाना वहिवाटी करिता निर्बंध घातले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलुंड (पूर्व) येथून फ्लेमिंगो निरक्षणासाठी पर्यटन स्थळ विकसित करण्यासह स्थानिक कोळी बांधवाना बोटीने ने-आण करण्यासाठी परवानगी व प्रशिक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या मंजूर व्यवस्थापन आराखड्यामध्ये तेथील स्थानिक मच्छिमार यांना पर्यटकांचे ने-आण करणेकरीता बोटींसाठी परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

(२) स्थानिकांच्या वहिवाटांकरीता निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

(३) ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या मंजूर व्यवस्थापन आराखड्यामध्ये पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. स्थानिक कोळी बांधवांना पर्यटकांना ने-आण करणेकरीता Eco-tourism Guide Training Programme अंतर्गत तेथील दहा ते पंधरा स्थानिक रहिवाश्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अनागोंदी कारभाराची करण्यात आलेली चौकशी

**(३२) * ८७ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती (जि.नाशिक) येथील अनागोंदी कारभाराची चौकशी अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आली असून, याबाबतचा सविस्तर चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, नाशिक यांच्याकडे कार्यवाहीसाठी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास देण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेतील नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती येथे अनागोंदी कारभाराची चौकशी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सुरगाणा, जि.नाशिक यांचेमार्फत करण्यात आली असून त्याबाबतचा सविस्तर चौकशी अहवाल दि.२४ एप्रिल, २०१८ रोजी सादर केला आहे.

(२) व (३) होय.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.०३.०२.२०२० च्या आदेशान्वये नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीला महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० नुसार चौकशी अहवालानुसार अनुपालन अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फये धनगरवाडा व एरंडपे (ता.भुदरगड, जि.कोल्हापुर) येथील गवारेडयाच्या हल्ल्यामध्ये शेतकऱ्याचा झालेला मृत्यु

**(३३) * ३५२६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील राधानगरी, भदुरगड, आजरा, चंदगड, गगनबावडा व शाहुवाडी तालुक्यामध्ये गवारेडे व हत्तींच्या उपद्रवामुळे शेतक-यांच्या ऊस, केळी, मका, काजू, बांबू, वर्णा यासह अन्य शेतपिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फये धनगरवाडा व एरंडपे (ता.भुदरगड) येथील गवारेडयाच्या हल्ल्यामध्ये गतवर्षात २ शेतकरी जखमी झाले असून शाहूवाडी तालुक्यात एका शेतक-याचा मृत्य झाल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गवारेडयांचा उपद्रव कमी करण्यासाठी वन विभागाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गवारेडयांचा उपद्रव कमी करण्यासाठी वन विभागाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

• वन्यप्राण्यांपासून लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने वन कर्मचा-यांचे गस्ती पथक तयार करणेत आले आहे.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पाण्याची उपलब्धता करुन देणेसाठी वनक्षेत्रात वनतळी माती बंधारे सिंमेंट बंधारे,गॅबीयन बंधारे बांधण्यात आलेले आहेत

• लोकांचे वनावरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• वन्यप्राणी वनक्षेत्रातून मालकी क्षेत्रात येऊ नयेत यासाठी गवा व इतर वन्यप्राणी प्रतिबंध चर काढण्यात आलेली आहे.

• परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(३४) * ३८३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर**

**दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीचे लाखो विद्यार्थी शिष्यवृत्ती वाटपातील प्रशासकीय उदासिनता व ऑनलाईन प्रक्रियेतील त्रुटींमुळे वंचित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या ५ लाख ७२ हजार विद्यार्थ्यांनी माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये शिष्यवृत्तीसाठी शासनाकडे अर्ज केले असून त्यापैकी केवळ १ हजार २४३ विद्यार्थ्यांच्या खात्यावरच शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची बाब शासनाच्या ४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या अहवालामध्ये दिसून आली असून, त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणातील ऑनलाईन प्रक्रियेतील त्रुटींची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने

ऑनलाईन प्रक्रियेतील त्रुटी दुर करुन उर्वरित विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१९-२० या वर्षामध्ये दिनांक ११.२.२०२० अखेर, महाडीबीटी पोर्टल वर भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशिप प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत नोंदणीकृत झालेल्या अनुसुचित जातीच्या ४ लाख ६० हजार ७६० अर्जांपैकी ३ लाख ८९ हजार ४३९ अर्ज पात्र ठरलेले आहेत. त्यापैकी, ३ लाख ५१ हजार २६३ अर्ज महाविद्यालयांनी मंजूर केलेले असून, त्यापैकी, २ लाख ७१ हजार ०३८ अर्जांचे रुपये ३७८ कोटी ३५ इतक्या रक्कमेची देयके महाडीबीटी पोर्टलव्दारे जनरेट करण्यात आलेली आहेत. त्यामधील १ लाख ४१ हजार ५२७ विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रुपये १७१.१६ कोटी व निर्वाहभत्त्याची रुपये ३५.०३ कोटी अशी एकूण रुपये २०६.१९ कोटी इतकी रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या महाडिबीटी पोर्टलवरील ई-वॉलेट वर वितरीत करण्यात आली आहे. उर्वरीत १ लाख २९ हजार ५११ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम रुपये १७२.१६ कोटी महाडीबीटी प्रणालीवरील (Pool account) व PFMS या प्रणालीव्दारे वितरणाची प्रक्रिया चालू आहे.

महाडिबीटी प्रणालीवर पात्र आढळुन आलेल्या सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना माहे मार्च, २०२० अखेरपर्यंत शैक्षणिक लाभ अदा करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील २५ बोगस मजूर सहकारी संस्थांबाबत

**(३५) * ११७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील २९६ मजूर सहकारी संस्थापैकी २५ बोगस मजूर सहकारी संस्थांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्याने या संस्था अवसायानात काढण्याचे आदेश सहायक निबंधकांनी दिले असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त बोगस मजूर सहकारी संस्थेच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्हयात एकूण २९६ मजूर संस्था असून त्यापैकी खालापूर (जि.रायगड) तालुक्यात २९ नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था आहेत. यापैकी २७ संस्थांनी कागदपत्रे सादर न केल्याने, कायदा, नियम व उपविधीप्रमाणे कामकाज करणे बंद केल्याने, विवरणपत्र सादर न केल्याने, वार्षिक सभा न घेतल्याने, पंचवार्षिक निवडणूक न घेतल्याने, लेखापरिक्षण न केल्याने, व्यवस्थापक समिती सभा न घेतल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात येत असून सदर संस्थांचे अवसायनाचे अंतरीम आदेश काढण्यात आलेले आहेत. त्यावर त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या सर्व शाखांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३६) * ५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या सर्व शाखांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला असून बँकेचे अध्यक्ष व व्यवस्थापनाने कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा विशेष लेखापरिक्षक संस्था, अलिबाग रायगड यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांना सादर केलेल्या अहवालात ५१२ कोटी ५४ लाख रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमुद केले असून, सदर गैरव्यवहारात कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्ट व कर्नाळा ॲकॅडमीचा देखील समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी हजारो ग्राहकांना व ठेवीदारांना आपल्या ठेवी परत मिळत नसून वारंवार मागणी करुनही धनादेश किंवा आरटीजीसव्दारे पैसे मिळाले नाहीत तसेच बँकेच्या व्यवस्थापनाकडून ग्राहकांना व ठेवीदारांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांची व ठेवीदारांची फसवणूक करणाऱ्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्ष व व्यवस्थापनावर फौजदारी गुन्हा दाखल करुन ग्राहकांना व ठेवीदारांना बँकेतील गुंतवणुक केलेली रक्कम तातडीने परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

रिझर्व बँकेच्या दिनांक २२.०४.२०१९ रोजीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार सदर बँकेचे विशेष

लेखापरिक्षण करण्यात आले आहे. सदर लेखापरिक्षण अहवालानुसार एकूण ६३ कर्जप्रकरणांमध्ये रु.५१२.५४ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी १७ कर्जप्रकरणांमधील रक्कम रु. ९५.३१ कोटी कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्ट व कर्नाळा ॲकेडमी यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग झाल्याचे लेखापरिक्षण अहवालावरुन निदर्शनास येत आहे.

(३) व (४) सदर बँकेच्या ठेवीदारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने बँकेच्या ठेवीदारांना तात्काळ ठेवी देण्याबाबत सहकार आयुक्तांनी बँकेस आदेश दिले आहेत.

अधिनियमातील कलम ८१ अन्वये आर्थिक गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक २१.०१.२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल पोलीस स्टेशन, पनवेल यांना फिर्याद दाखल करणेबाबत पत्र दिले असून त्यानुसार संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करण्यासाठी अधिनियमातील कलम ८८ अन्वये कार्यवाही करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांची दिनांक ०४.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये डोंगर पोखरुन रस्ता केल्याबाबत

**(३७) * ४६७९ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरसावे शासकीय विश्रामगृहामागे (जि.ठाणे) असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये डोंगर पोखरुन रस्ता

करण्यात येत असून यामध्ये नैसर्गिक तलावामध्ये भराव टाकण्यात आल्याप्रकरणी सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्याबाबत वन विभागाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीलगतच्या इको सेन्सेटिव्ह झोनच्या दहिसर चेकनाक्यापासून मीरा, काशी, वरसावे, घोडबंदर, चेणे व काजूपाडयापर्यंत राजरोसपणे बेकायदा खोदकाम व भराव बांधकामाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणाचा सर्रासपणे ऱ्हास करणाऱ्या संबंधित कंपनी विरोधात गुन्हा नोंदविण्यात येऊन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) ठाणे जिल्हयातील मौजे वरसावे येथील शासकीय विश्रामगृहामागे असलेल्या सर्वे क्रमांक ३४ मधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या इको सेन्सीटीव्ह झोनमध्ये सनियंत्रण समितीची परवानगी न घेता रस्ता तसेच नैसर्गिक तलाव सुशोभिकरण व दगडी गटाराचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही ठाणे वन विभागाव्दारे करण्यात आली आहे.

(२) दहिसर चेकनाक्यापासून मीरा, काशी, वरसावे, घोडबंदर, चेणे व काजूपाडयापर्यंतच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिनस्त वनक्षेत्रात बेकायदा खोदकाम, भराव, बांधकामे होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही ठाणे वन विभागाव्दारे करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषद सहकारी पतसंस्थेने ठेवीच्या रकमेतून केलेला गैरव्यवहार

**(३८) * ३७७१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने ठेवीची रक्कम आर्णी (जि.यवतमाळ) येथील दुसऱ्या पतसंस्थेमध्ये कमी व्याज दराने गुंतवणुक करुन गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी सहकारी पतसंस्थेने अधिनियम १९६० चे कलम १७ चे उल्लघंन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांनी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली. सदर अधिकाऱ्यानी सादर केलेल्या अहवालामध्ये उपरोक्त संस्थेने जिल्हा परिषद शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. यवतमाळ या पतसंस्थेमध्ये केलेल्या गुंतवणूकीमुळे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्याचे नमूद केले नाही. मात्र सदर निधीची गुंतवणूक करताना अधिनियमातील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांमधील सूचनांकडे संचालक मंडळाने दुर्लक्ष केल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

वरील चौकशी अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांनी अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी अधिकाऱ्याची दिनांक ०५.०६.२०१८ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती

केली. जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांच्या वरील आदेशाविरुध्द संबंधितांनी विभागीय सहनिबंधक, अमरावती यांचेकडे रिव्हीजन दाखल केले. विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी त्यांच्या दिनांक २८.११.२०१८ च्या आदेशान्वये वरील मुद्दयाच्या चौकशीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या कापसाचे चुकारे अदा करण्याबाबत

**(३९) * १८९ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने शेतकऱ्यांकडून ७ लाख ६० हजार क्विंटल कापूस खरेदी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांना ४०० पैकी २०० कोटी रुपयांचे चुकारे अदा केले असून उर्वरित २०० कोटी रुपयांचे चुकारे थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांचे थकीत चुकारे तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कापूस पणन महासंघाद्वारे एकूण ७४ कापूस खरेदी केंद्रांवर ११३ जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्रीमध्ये किमान आधारभूत दराने कापूस खरेदी चालू असून दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० पर्यंत एकूण ३५.७१ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. खरेदी केलेल्या कापसाचे एकूण मूल्य रुपये १९८१ कोटींपैकी रुपये १३८४ कोटी रुपयांचे चुकारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेले असून उर्वरित रुपये ५९७ कोटी अदा करण्याची कार्यवाही महासंघाद्वारे सुरु आहे.

(३) व (४) शेतकऱ्यांचे चुकारे तात्काळ अदा करण्यासाठी कापूस पणन महासंघाने बँक ऑफ इंडिया कडून घेतलेल्या कर्जाकरिता रुपये १८०० कोटींची शासनहमी मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंजवडी (जि.पुणे) येथील विजेच्या धक्क्याने तीन कामगारांचा झालेला मृत्यु

**(४०) * ९४३ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (जि.पुणे) आय टी पार्कच्या फेज ३ मध्ये पथदिवे लावताना विजेच्या धक्क्याने ३ कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) पथदिवे बसविण्याच्या कामात अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदर कंत्राटी कामगारांचा मृत्य झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर कंत्राटी कामगार पुरविणाऱ्या ठेकेदाराने सुरक्षेची उपाययोजना न करता कामगारांमार्फत विजेचे पथदिवे लावण्याचे काम केलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

कंत्राटदाराने काम करताना करारातील नमूद अटीप्रमाणे कामगाराच्या सुरक्षा विषयक काळजी घेणे आवश्यक होते, ती घेतली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

याबाबत कंत्राटदार व त्यांचा पर्यवेक्षक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलीसांमार्फत सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे, तसेच विद्युत निरीक्षक यांच्यामार्फत चौकशी चालू आहे.

सदर घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही. तथापि, त्यांना मानवीय दृष्टीकोनातून मदत करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील तुर खरेदी मध्ये झालेला गैरव्यवहार

**(४१) * २४०० श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जिल्हा बुलढाणा) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सन २०१६-१७ मध्ये तुर खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार

झाला असल्याचे दिनांक १ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तत्कालीन संचालक, श्री.देशमुख यांनी दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी जिल्हा उपनिबंधक, बुलढाणा यांच्याकडे दाखल केलेली तक्रार शासनास प्राप्त झाली असून, तत्संदर्भातील अहवाल चौकशी समितीने उपनिबंधकाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालात संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याचे निर्देश असतांना देखील अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद असलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.

(२) श्री.देशमुख यांनी दिनांक २/०५/२०१७ व दिनांक ५/०२/२०१७ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यासाठी श्री. दिपक जाधव, विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ (फिरते पथक) बुलढाणा यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. श्री.जाधव यांना दिनांक ५/०४/२०१८ रोजी सादर केले आहे.

(३) व (४) दिनांक ५/०४/२०१८ रोजीच्या अहवालातील नांदूरा येथील तूर खरेदी केंद्रावर अपेक्षेपेक्षा ७११९ क्विंटल तूर जास्त प्रमाणात खरेदी केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा पणन अधिकारी, मलकापूर, विदर्भ पणन महासंघ, नागपूर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला होता. जिल्हा पणन अधिकारी, मलकापूर यांनी दिनांक ७/१२/२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने नांदूरा खरेदी केंद्रावरील तूरीचा पंचनामा करुन, शेतकऱ्यांनी खरेदी वेळी दिलेला ७/१२ उतारा त्यावरील पिकपेरा व हेक्टरी उत्पादनानुसार खरेदी करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांकडून सेल्फ डिक्लरेशनही घेण्यात आले आहे. सदर खरेदी प्रक्रियेत कुठल्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही. असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना कळविले आहे.

श्री.देशमुख यांच्या तक्रारीवर कार्यवाही सुरु असताना, त्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे याचिका क्रमांक ५९४९/२०१८ दाखल केलेली असून, सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मुख्यमंत्री सौर कृषीपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जाबाबत

**(४२) * १०३ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गम भागातील व लांब पल्ल्याच्या शेतांना वीज जोडणी देण्यासाठी शासनाकडून मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विज वितरण कंपनीकडे परभणी, चंद्रपुर, उस्मानाबाद व जालना जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव मंजूर करण्यात आले व किती अपात्र ठरविण्यात आले आहेत,

(४) असल्यास, मंजूर प्रस्तांवापैकी केवळ मर्यादित शेतकऱ्यांना सौर कृषी पंपाचा लाभ देण्यात आला असून उर्वरित पात्र शेतकरी सौर कृषी पंपासाठी पैसे भरूनही त्यांना कृषीपंप देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना कृषीपंप अद्याप न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच कृषीपंप मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाचे पारंपारिक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चात व राज्य शासनाद्वारे सबसीडीपोटी देण्यात येणाऱ्या अनुदानात बचत व्हावी, याकरिता राज्यातील शेतकऱ्यांना कृषि वापरासाठी पारेषण विरहीत सौर कृषि पंप देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरू करण्यात आली आहे.
(२) परभणी, चंद्रपुर, उस्मानाबाद व जालना जिल्हयातून मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत एकूण ५२,०७६ अर्ज प्राप्त झाले आहेत.
(३) मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत ९७,४५६ अर्ज मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ५५,८५२ अर्जदारांनी लाभार्थी हिश्श्याचा भरणा केलेला आहे. परभणी, चंद्रपूर, उस्मानाबाद व जालना जिल्हयामधील प्राप्त अर्ज, अपात्र अर्ज, मंजूर अर्ज व मागणीपत्र दिलेले अर्ज आणि मागणीपत्रानुसार लाभार्थी हिस्सा भरणा केलेले अर्जांची माहिती खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | जिल्हा | प्राप्त अर्ज | अपात्र झालेले अर्ज | मंजूर व मागणीपत्र दिलेले अर्ज | अतिरिक्त अर्ज | मागणीपत्रा नुसार लाभार्थी हिस्सा भरणा केलेले अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | परभणी | ९३९७ | ३५४६ | ५२५३ | ५९८ | २७८७ |
| २ | चंद्रपूर | २८९४ | ७६६ | २१२८ | ०० | ११५० |
| ३ | उस्मानाबाद | ९३७२ | १४९१ | ३९१५ | ३९६६ | २१५१ |
| ४ | जालना | ३०४१३ | ९४०४ | १२१६५ | ८८४४ | ७६२८ |

(४) व (५) हे खरे नाही. पात्र शेतकऱ्यांची सौर कृषीपंपासाठी लाभार्थी हिस्सा भरणा केल्यानंतर सौर कृषीपंप आस्थापित करण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. आजतागायत परभणी, चंद्रपूर, उस्मानाबाद व जालना जिल्हयात अनुक्रमे ८२४, ७२२, ४२९ व ३४३९ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

शासनाने प्रथमच मोठया प्रमाणावर १ लाख सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे योजिले आहे. त्यामुळे सुरुवातीस सौर कृषीपंप पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांची क्षमता ही मर्यादीत होती. तसेच योजनेतील तरतूदीनुसार शेतकऱ्यांना सूचीबध्द केलेले पुरवठादार यांची निवड करणे मुभा असल्याने त्यांनी निवडलेल्या पुरवठादाराकडून सौर पंप आस्थापित करणे क्रमप्राप्त आहे. पुरवठादारांच्या निवडीकरीता सुरुवातीला शेतकऱ्यांकडून लागलेला कालावधी, सततच्या सुरु असलेल्या पावसामुळे व शेतातील पिकांमुळे या योजनेच्या प्रगतीची गती मंदावली होती. त्यानंतर पुरवठादारांची संख्या वाढवून सौर कृषीपंप आस्थापित करण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(४३) * २६७३ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिनांक २५ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०१८-१९ या वर्षातील कांदा अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

(२) यवतमाळ जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरखेड यांच्याकडून प्राप्त १० शेतकऱ्यांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव तालुकास्तरीय

समितीने अपात्र ठरविले होते. यामध्ये श्री.आडे यांच्या प्रस्तावाचा समावेश आहे. सदर प्रस्ताव मा. लोकप्रतिनिधी यांच्या विनंतीनुसार फेरतपासणीसाठी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उमरखेड यांच्याकडे परत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण अहवाल शासनास सादर करण्याबाबत

**(४४) * ५८४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे २९८०८ संस्थांपैकी, सुमारे १००८७ सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण अहवाल सादर केला नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी संस्थेने प्रत्येक वर्षी माहे जुलै अखेर पर्यंत संस्थेचे कामकाज व ताळेबंदाचे लेखापरिक्षण करुन त्याचा अहवाल माहे सप्टेंबर पर्यंत पाठविणे बंधनकारक असतांना देखील कारभारातील गैरव्यवहार लपवण्यासाठी संचालकांकडून लेखापरिक्षण करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लेखापरिक्षण अहवाल माहे सप्टेंबर अखेरपर्यंत सादर न करणाऱ्या उपरोक्त सहकारी संस्थेविरुध्द सहकार

कायद्यातील तरतूदीनुसार अपात्र करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सहकारी संस्थांनी वेळेत लेखापरिक्षण अहवाल सादर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१८-१९ या वर्षात लेखापरिक्षणासाठी मुंबईतील एकूण २९,८९४ सहकारी संस्था पात्र होत्या. त्यापैंकी माहे जानेवारी, २०२० अखेर एकूण २२,१३२ संस्थांचे लेखापरिक्षण पूर्ण झाले असून, ७,७६२ संस्थांचे लेखापरिक्षकांना लेखापरिक्षण करण्यासाठी संस्थांकडून दप्तर उपलब्ध करुन न देणे, लेखापरिक्षण करण्यासाठी सहकार्य न करणे, संस्थांचे दप्तर अपूर्ण असणे, पत्ता न सापडणे इत्यादी कारणास्तव संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही.

(३) व (४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यास्तरावर वेळोवेळी झालेल्या मासिक सभांमध्ये क्षेत्रीय कार्यालयांना १०० % संस्थांचे लेखापरीक्षण पुर्ण करण्याबाबत वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत.

तसेच, सहकार आयुक्त यांच्या दि.६/२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मुंबई मधील जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ यांना पुन्हा सर्व संस्थांचे लेखापरीक्षण करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

संबंधित निबंधकांनी लेखापरिक्षण न झालेल्या मुंबईतील एकूण ७,७६२ संस्थांपैकी ६०८ संस्थांना कलम १०२ अन्वये अवसायनपूर्व नोटीस दिली असून, ३,१४३ संस्थांना लेखापरिक्षण करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५(५) अन्वये ११८१ संस्थांची सुनावणी सुरु असून, उर्वरित संस्थांवर कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. ज्या संस्था लेखापरिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन देणार नाहीत, त्यांच्या विरुध्द अधिनियमातील ८०(१) अन्वये रेकॉर्ड जप्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे ज्या लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६९(ग) अन्वये त्यांचे नाव नामतालिकेतून कमी करण्यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन उचित कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (ता.जि.पालघर) येथील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील एन.के.फार्मा प्रा.लि. (तारा नायट्रेट) व हर्शुल केमिकल प्रा.लि. या रासायनिक कारखान्यात झालेला स्फोट

**(४५) * ८८ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.शिरीष चौधरी**

**(रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील एम-२ प्लॉट मधील एन.के.फार्मा प्रा.लि. (तारा नायट्रेट) या रासायनिक कारखान्यात भट्टीचा भीषण स्फोट झाल्याने ८ कामगारांचा मृत्यू व २ लहान मुलींसह ७ जण गंभीर जखमी झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अग्निशमन दल, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून संपूर्ण परवानग्या न घेताच तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ग्रॅट ऑफ फर्स्ट कन्सेंट टू ऑपरेट अंडर रेड/एसएस कॅटेगरीची दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास परवानगी घेऊन प्रायोगिक तत्वावर रासायनिक कारखान्यात अमोनियम नायट्रेटचे उत्पादन सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तारापूर (जि.पालघर) एमआयडीसीमधील हर्शुल केमिकल प्रा.लि. या रासायनिक कंपनीस देखील दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मोठी आग लागून त्यात २ कामगार जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोईसर औद्योगिक क्षेत्रातील विविध कारखान्यांत गेल्या दोन वर्षांत झालेल्या अपघातांमध्ये २१ कामगारांचा मृत्यू व १५ कामगारांना कायमस्वरूपी अपंगत्व आले असून अनेक कामगार गंभीर जखमी झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी औद्योगिक वसाहतीतील सर्व रासायनिक कारखान्यांची पाहणी करण्यासाठी समिती गठीत करुन धोकादायक रासायनिक कारखाने बंद करण्यासाठी कोणती उपाययोजना

केली आहे तसेच मृत व जखमी झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना मदत तसेच उक्त घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) व (२) मे. ए.एन.के फार्मा प्रा.लि. या रासायनिक कारखान्यात दिनांक ११.०१.२०२० रोजी रात्री ०७.०० वाजताच्या सुमारास उत्पादन प्रक्रिये दरम्यान रिॲक्टरचा स्फोट झाल्याने ६ कामगारांचा व कारखान्याच्या आवारात राहणाऱ्या कुटुंबियापैकी २ व्यक्ती अश्या एकूण ८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

तसेच सदर दुर्घटनेत २ लहान मुलीसह ७ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ६ व्यक्तींना उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून एक व्यक्ती अद्याप उपचार घेत आहे.

सदर कारखाना व्यवस्थापनाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वसई, जिल्हा पालघर या कार्यालयाकडून परवाना घेतलेला नव्हता. परंतु, कारखान्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक ०२.०१.२०२० रोजी धोकादायक कारखाना चालविण्याबाबतचे रेड/ एसएसआय कॅटेगरीचे कन्सेट टू ऑपरेट घेतले होते.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर अपघाताची चौकशी केली असता कारखाना व्यवस्थापनाने दिनांक ०९.०१.२०२० पासून आर्थोक्लोरो बेंझाईक ॲसीड (OCBA) या रसायनाचे उत्पादन प्रायोगिक तत्वावर सुरु केल्याचे आढळून आले आहे.

(३) हर्शुल केमिकल प्रा.लि. या रासायनिक कंपनीत झालेल्या अपघातात २ कामगार भाजून जखमी झाले आहेत. एक कामगार अंदाजे ४० टक्के भाजला असून त्यांचेवर सध्या थुंगा हॉस्पीटल, मीरा रोड येथे उपचार सुरु आहेत. तसेच दुसऱ्या एका कामगाराच्या हाताला किरकोळ भाजण्याच्या जखमा झाल्या असून त्याला त्याच दिवशी उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

(४) व (५) मागील दोन वर्षात एमआयडीसी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील विविध कारखान्यात झालेल्या अपघातांमध्ये २४ कामगारांचा मृत्यू झाला असून ९७ कामगार जखमी झाले आहेत. तसेच १३ कामगारांना अपंगत्व आलेले आहे.

मे. ए.एन.के फार्मा प्रा.लि. या रासायनिक कारखान्यात दिनांक ११.०१.२०२० रोजी झालेल्या दुर्घटनेच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण भवन यांचे अध्यक्षतेखाली दि.१५.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. तसेच राज्यातील रासायनिक व धोकादायक कारखान्यांचे औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा परिक्षण (Safety Audit) व उपाययोजना सुचविण्याबाबत दि. १७.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निहाय समिती गठित करण्यात आली असून सहा महिन्यांचे आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर दुर्घटेनत मृत कामगारांच्या वारसास मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत प्रत्येकी ५ लक्ष इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी देण्यात आली आहे.

सदर अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अग्नीशामक विभाग व पोलीस विभाग यांचेमार्फत करण्यात आली असुन औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत कारखान्याच्या संचालकांविरुध्द नियम भंगाकरिता दोन फौजदारी खटले (क्र. २६३५/२०२० व २६३६/२०२०) मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस विभागामार्फत कारखान्याच्या संचालकांवर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३०४अ, २८६, ३३७, ४२७ च्या भंगाकरीता क्रमांक २०१४/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक १३.०२.२०२० रोजी सदर कारखान्यास कारखाना बंद करण्याचे आदेश पारित केले आहेत.

मे.हर्शुल केमिकल्स प्रा.लि., एमआयडीसी तारापूर, बोईसर, जि.पालघर या कारखान्यात दि.०४.०२.२०२० रोजी झालेल्या अपघाताची चौकशीबाबतची कार्यवाही औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय त्यांचे स्तरावरुन सुरु आहे.

सदर अपघातातील जखमी कामगारांच्या औषधोपचार व वैद्यकीय उपचारावरील खर्च कारखाना व्यवस्थापन करीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात महावितरणासह बेस्ट, अदानी व टाटा समुहाकडून वीजेचा पुरवठा करणाऱ्या कंपन्याकडून होत असलेली वीज दरवाढ

**(४६) * १७५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणासह बेस्ट, अदानी व टाटा समुहाकडून वीजेचा पुरवठा होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा करणाऱ्या अदानी, टाटा व बेस्ट पाठोपाठ राज्य शासनाच्या महावितरणनेही सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीसाठी पारेषण शुल्क वाढीचा प्रस्ताव महापारेषणमार्फत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुढील पाच वर्षात वीज कंपनीकडून ग्राहकांना पुरवली जाणारी वीज पाच रुपये प्रति युनिटवर जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रस्तावावर महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने कोणती निर्णय घेतला आहे, त्यानुसार ग्राहकांच्या वीज देयकात दरमहा किती रुपये वाढ करण्यास आयोगाने मान्यता दिली आहे,
(५) असल्यास, माहे एप्रिल, २०१९ मध्ये वीज दरवाढ करण्यात आलेली असतांना पुन्हा वीज दरवाढ करण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त विज दरवाढीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,
(६) असल्यास, उक्त वीज दराच्या प्रस्तावाबाबत शासनाने फेरविचार करुन ग्राहकांवरील अधिकचा भुर्दंड कमी करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, शासनामार्फत करण्यात येणारा विज पुरवठा खाजगी कंपन्याऐवजी संपूर्णत: शासकीय कंपन्याद्वारे करण्याच्या दृष्टिने आवश्यक ती यंत्रणा उभारण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुंबई महानगर व मुंबई उपनगर परिसरात बेस्ट, अदानी आणि टाटा पॉवर कंपनीकडून ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच मुंबई उपनगरातील मुलुंड, भांडुपसह राज्यातील इतर भागातील ग्राहकांना महावितरणकडून वीज पुरवठा करण्यात येतो. या सर्व वीज वितरण कंपन्या ग्राहकांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी वीजनिर्मिती कंपन्यांकडून विजेची खरेदी करुन पारेषण यंत्रणेमार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचवत असतात. या सर्व बाबींचा (वीज खरेदी, पारेषण व वितरण) खर्च विचारात घेऊन ग्राहकांसाठी लागू करावयाचे वीज दर ठरवण्यात येतात.

पारेषण शुल्काबाबत प्रस्ताव सादर केलेला नाही. तथापि, महाराष्ट्रात वीज पुरवठा करणाऱ्या सर्व वीज वितरण कंपन्यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१९ नुसार सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीसाठी स्वतंत्रपणे वीज दराच्या निश्चिती करणासाठी आयोगासमोर प्रस्ताव सादर केलेले आहेत.

(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१९ नुसार आयोगासमोर निश्चितीकरणासाठी आलेले वीज दर हे दि. १.४.२०२० पासून लागू होणे अपेक्षित असून महावितरण, बेस्ट, अदानी व टाटा पॉवर कंपन्यांकडून वीज संदर्भातील याचिकांची आयोगामार्फत छाननी, शहानिशा, ग्राहकांच्या सूचना व हरकती बाबत जाहिर सुनावणी घेऊन अंतिम करण्यात येत असून, सद्यस्थितीत त्या आयोगासमोर न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने अद्याप आपला निर्णय जाहीर केलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

(७) सद्यस्थितीत राज्यात मुंबई वगळता प्रामुख्याने महावितरण या कंपनीद्वारे वीज पुरवठा केला जात असून खाजगी कंपन्याऐवजी संपूर्णत: शासकीय वीज कंपन्याद्वारे वीज पुरवठा करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कामगारांच्या सुरक्षिततेबाबत

**(४७) * १५० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीत सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८ ते माहे जुन, २०१९ पर्यंत अनेक कारखान्यांमध्ये स्फोट झाल्यामुळे लागलेली आग व वायुगळती अशा विविध घटनांमुळे अनेक कामगारांचा मृत्यु झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहत परिसरातील ९०७ हेक्टर जागेवर १२०० भूखंडांवर शेकडो छोटया-मोठया कारखान्यांमध्ये मोठी औद्योगिक उलाढाल होत असून इंजिनियरिंग, मत्स्य प्रक्रीया, फुड, रसायने आदी कारखान्यांचा समावेश असून लाखो कामगार काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतींमध्ये आपतकालीन आराखडा नसल्यामुळे कामगारांना व नागरिकांना कंपनीमध्ये होणाऱ्या अपघाती घटनांमुळे आपला जीव गमवावा लागत असून अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त औद्योगिक वसाहतींमध्ये आपत्कालीन आराखडा तयार करुन कामगारांच्या सुरक्षिततेकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीत सन २०१६ ते जून, २०१९ पर्यंत एकूण २० कारखान्यांमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. सदर घटनेत ११ कामगार मृत व ४ कामगार जखमी झाले आहेत. तसेच ४ कारखान्यांमध्ये स्फोटाच्या घटना घडल्या असून त्यात ७ कामगार जखमी झाले आहेत. तसेच एका कारखान्यात वायुगळतीची घटना घडली असून त्यात २ कामगार बाधीत झाले आहेत.

सदर घटना घडल्याचे त्या-त्या वेळी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या निदर्शनास येवून त्यांचेमार्फत संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) व (४) अतिधोकादायक व धोकादायक प्रक्रिया असलेल्या कारखान्यांनी आपत्कालिन प्रतिसाद योजना तयार केल्या असून त्यानुसार कारखान्यांमध्ये मॉक ड्रिल घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राळेगाव, कळंब (जि.यवतमाळ) येथे शेतकऱ्यांच्या शेतामधुन टाकण्यात आलेल्या ट्रान्समिशन लाईन्सबाबत

**(४८) * ४२२५ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव, कळंब (जि.यवतमाळ) परिसरात पावरग्रीड कंम्पनीने शेतकऱ्यांच्या शेतामधुन टाकलेल्या वरोरा ते परळी ७६५ के.व्ही ट्रान्समिशन लाईन व पावर लाईन संबंधीत जमीनीचा मोबदला दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णयानुसार देण्यात यावा असे आदेश दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ रोजी तत्कालीन उर्जा मंत्री यांनी बैठकीत पावरग्रीड कंपनीला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी महसुल राळेगाव, (जि.यवतमाळ) यांनी शेतकऱ्यांच्या शेतीचे मुल्यांकन करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीकडून अद्यापही कोणत्याही शेतकऱ्यांना मोबदला दिला नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तसेच त्यानुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीचा मोबदला लवकरात लवकर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीमार्फत वरोरा परळी ७६५ के.व्ही. पारेषण वाहिनीची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर वाहिनीग्रस्त शेतकऱ्यांना मोबदल्यासंदर्भात तत्कालीन मा. मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर वाहिनीच्या उभारणीसाठी पॉवर ग्रीड कंपनीकडून दिनांक ३१.०५.२०१७ नंतर मुल्यांकनासाठी प्रस्तावित केलेल्या सर्व शेतकऱ्यांना शासन निर्णय दिनांक ३१.०५.२०१७ अनुसार मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२), (३), (४) व (५) पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीने कळविल्यानुसार वाहिनीग्रस्त शेतकऱ्यांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक धोरण- २०१६/ प्र.क्र.५२० / ऊर्जा-४, दिनांक ३१.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मोबदल्याची रक्कम देण्यात आली असून ५ प्रकरणांतील शेतक-यांनी आवश्यक कागदपत्रे पॉवरग्रीड कंपनीस सादर न केल्याने मोबदल्याची रक्कम देणे प्रलंबित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील विळेभागाड औद्योगिक क्षेत्रातील क्रिप्टझो इंजिनियरिंग कंपनीमध्ये झालेला स्फोट

**(४९) * १५२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील विळेभागाड औद्योगिक क्षेत्रातील क्रिप्टझो इंजिनियरिंग कंपनीमध्ये झालेल्या स्फोटामध्ये १६ कामगार जखमी होवून २ कामगारांचा मृत्यु झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनी सन २०१६ पासून अवैधरित्या सुरू असून कंपनीला सन २०१८ मध्ये परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीच उपाययोजना न करता मागील ३ वर्ष कंपनी बेकायदेशीरपणे सुरु असल्यामुळे कंपनीमध्ये दुर्घटना घडून कामगारांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे जखमी व मृत्यु झालेल्या कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयाना कंपनीमार्फत मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) दिनांक १५/११/२०१९ रोजी मे. क्रिप्टझो इंजिनियरींग लि., या कारखान्यात उत्पादनाची चाचणी करीत असताना झालेल्या स्फोटामध्ये ३ कामगारांचा मृत्यू झाला असून १५ कामगार जखमी झाले आहेत.

(२) मे. क्रिप्टझो इंजिनियरींग लि. हा कारखाना दिनांक ११/१/२०१८ रोजी पासून सुरु आहे. कारखाना भोगवटादाराने माहे फेब्रूवारी २०१९ मध्ये नोंदणीसाठी अर्ज केल्यानुसार सन २०१८ पासून कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत मे.क्रिप्टझो इंजिनियरिंग लि. या कारखान्याला परवाना देण्यात आलेला आहे.

(३) कारखान्यात इनर्ट गॅस फ्लडींग सिस्टीमची तपासणी बेकायदेशीरपणे व सुरक्षिततेची काळजी न घेता केल्याने कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत कामगारांना जीव गमवावा लागला आहे.

(४) मे.क्रिप्टझो इंजिनियरिंग लि. या कारखान्यात दि.१५.११.२०१९ रोजी झालेल्या अपघातात मृत्यू पावलेल्या ३ कामगारांच्या वारसांना प्रत्येकी रु.१०,००,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी कारखाना व्यवस्थानामार्फत देण्यात आलेली आहे. तसेच कारखाना व्यवस्थापनामार्फत तीनही मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाईपोटी एकूण रु.२४,४७,५२०/- इतकी रक्कम आयुक्त नुकसान भरपाई यांचे न्यायालयात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाने जखमी कामगारांच्या हॉस्पिटलचा व औषधोपचाराचा रु. ९० लक्ष इतका खर्च केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.